# देवाच्या सेवेसाठी एकत्रित काम करणे

**प्रार्थना :** ''प्रिय देवा, मुलांचा विश्वास नवा कर, त्यांनी तुझ्या सेवेसाठी पापापासून वळावे याकरीता त्यांचे साहाय्य कर.''

मुलांच्या गरजा आणि वय यानुसार शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

**मोठया मुलांने किंवा शिक्षकांनी 2 इतिहास अध्याय 30** मधून हिज्कीया राजाविषयी सांगावे अथवा वाचून दाखवावे.



- राजाने आपल्या लोकांकडे शिक्षक पाठवून त्यांच्यामध्ये संजीवन कसे आणले हे ह्या कथावृत्तांतात सांगितले आहे.

**कथा वृत्तांत्त सांगून** झाल्यावर पुढील **प्रश्न** विचारा *(प्रत्येक प्रश्नापुढे उत्तरे दिली आहेत).*

- यरुशलेमेमध्ये वल्हांडणचा सण साजरा करुन देवाची उपासना करण्यासाठी सर्व लोकांना कोणी निमंत्रण पाठवले? *(उत्तर : पाहा वचन 1).*
- राजाने हे निमंत्रण कसे पाठवले? *(उत्तर : वचन 10, त्याने दूत-जासूद पाठवले).*
- काही लोकांनी कशा प्रकारचा प्रतिसाद दिला? *(उत्तर: पाहा वचन 11)*
- काही लोकांना उत्तम प्रतिसाद देण्याची प्रेरणा कोणी दिली? *(उत्तर : पाहा वचन 12)*
- देवाच्या वचनातून ऐकलेल्या गोष्टी लोकांनी कशा प्रकारे प्रत्यक्षात आमंलात आणले? *(उत्तर : पाहा वचन 14)*
- लोकांनी या प्रकारे कोणत्या राजाच्या कारकीर्दीत शेवटचा वल्हांडणाचा सण साजरा केला होता? *(उत्तर: पाहा वचन 26)*

आपल्या लोकांमध्ये नवजीवन आणणाया हिज्कीया राजाच्या कथा वृत्तांत्ताचे नाट्यीकरण करा. ही छोटीशी नाटिका सादर करण्यासाठी उपासनेच्या पुढायाशी बोलून व्यवस्था करा. मुलांकडून तयारी करुन घ्या. मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.

- **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात :

  **निवेदक.** कथावृत्तांत्ता सारांश तयार करुन मुलांकडून संवाद पाठ करुन घ्या.

  **हिज्कीया राजा.** हातात काही कागद ठेवा.

- **लहान मुलांनी** पुढील भूमिका कराव्यात.

  **राजाचा जासूद**

  **टर उडवणारे**

  **संदेशाकडे लक्ष देणारे लोक याजक**

**निवेदक :** 2 इतिहास 30:1-12 मधून कथावृत्तांत्ताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''हिज्कीया राजाचे फर्मान ऐका.''

**हिज्कीया राजा :** ''जासूद, इस्राएलाच्या नगरानगरात जा. त्यांना हा संदेश कळवा. वल्हांडणाचा सण साजरा करण्यासाठी यरुशलेमेला या. आपण सर्वांनी पश्चात्ताप करुन देवाचा आशीर्वाद मिळवणे अगत्याचे आहे''

**राजाचा जासूद :** प्रेक्षकांमधील वेगवेगळया लोकांकडे जाऊन म्हणा, ''पश्चात्ताप करा आणि वल्हांडणाचा सण साजरा करण्यासाठी यरुशलेमेमध्ये या!''

**टर उडवणारे :** ''खूप दूर आहे यरुशलेम. आम्ही तरी येणार नाही!''

**संदेशाकडे लक्ष देणारे लोक :** ''हो,हो, देव आपल्याला पश्चात्ताप करण्यास साहाय्य करील. आपण जाऊ तिकडे!''

**निवेदक :** 2 इतिहास 30:13-27 मधून कथा वृत्तांत्ताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''लोक काय म्हणतात ऐका''

**संदेशाकडे लक्ष देणारे लोक :** ''आम्ही वल्हांडण सणासाठी यरुशलेमेला आलो आहोत. आम्हांला एकाच खऱ्या देवाची सेवा करायची आहे. चला आपण येथे आसपास असणाऱ्या सर्व मूर्ति आणि वेद्या पाडून टाकू या!''

**हिज्कीया राजा :** ''ह्या मोठया सणासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी मी पुरवीन! आपण निराश होऊ नये. आपण पश्चात्ताप केला तर देव आमच्या प्रार्थना ऐकेल!''

**याजक :** ''असा एकत्र येऊन आनंद साजरा करणे चांगले आहे! आपण आणखी सात दिवस उत्सव करु या! शलमोन राजाच्या काळापासून असा उत्सव कधी झाला नव्हता!''

**निवेदक किंवा मोठे मूल :** नाटिका संपल्याचे सांगून मदत करणाऱ्यांचे आभार माना.

**प्रश्न विचारा.** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी मोठया माणसांना विचारावेत.

**चर्चा करा.** हिज्कीया राजाप्रमाणे आणखी कोणी कोणी असे केले याची उदहारणे द्या.

- देवाची गरज असणाऱ्या लोकांकडे पश्चात्तापाचा संदेश घेऊन आणखी इतर कोण गेले?
- आता, देवाचे लोक प्रार्थना व उत्सव साजरा करण्यासाठी कधी एकत्र जमतात?

संदेश लिहिलेल्या पत्राचे चित्र काढून मुलांना तसे काढण्यास सांगा. हे चित्र त्यांनी उपासनेच्यावेळी मोठया माणसांना किंवा घरी आई-वडीलांना दाखवावे. पश्चात्तापाचा संदेश आपण इतर लोकांकडे कसा नेतो, जेणे करुन आपल्या सर्वांना एकत्रितपणे प्रार्थना करुन देवाचा शोध करता येईल हे या चित्रावरुन दिसते असे स्पष्ट करण्यास सांगा. मोठया मुलांनी लहानांना मदत करावी.

**पाठ करा** फिलिप्पै 2:2-3

**कविता.** स्तोत्र 14:1-3 मधून तीन मुलांनी प्रत्येकी एक वचन म्हणावे.

मोठया मुलांनी आध्यात्मिक दृष्टया नवीकरण होणे ह्या विषयावर कविता, गाणी किंवा नाटिका लिहावी त्यांना यावर एकत्रितपणे घरीसुद्धा काम करता येईल.

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, आम्हीही इस्राएल लोकांसारखेच हट्टी आणि अविश्वासू आहोत. आम्ही पश्चात्ताप करतो तेव्हा तू तत्परतेने नेहमीच आमचे ऐकतो यासाठी आम्ही तुझी स्तुती करतो. आम्ही एकत्र होऊन उत्सव करतो तेव्हा तू आम्हांला महान आशीर्वाद देतोस.''



हिज्कीयाच्या जासूदांनी लोकांना शिकवले.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net